# जाहिरात

## प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अहेरी जि. गडचिरोली

यांच्या अधिनस्त येत असलेल्या एकुण ११ शासकीय आश्रम शाळामध्ये शिक्षकांच्या रिक्त पदांमुळे शैक्षणिक सत्र २०२१-२२ मध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता अत्यंत तात्पुरत्या स्वरूपात तासिका तत्त्वावर शासन नियमानुसार नेमणूक करावयाची आहे. तरी इच्छुक पात्र उमेदवारांनी शैक्षणिक कागदपत्रांसह अर्ज दिनांक २९.११.२०२१ पर्यंत प्रकल्प कार्यालय, अहेरी येथे व्यक्तिशः सादर करावेत, तदनंतर प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.

ज्या उमेदवारांनी यापूर्वी शैक्षणिक सत्र २०२१-२२ मध्ये तासिका तत्त्वावर नियुक्तीकरिता या कार्यालयास विनंती अर्ज सादर केलेले आहे, अशा उमेदवारांनी पुनश्चः अर्ज करण्याची आवश्यकता नाही, परंतु संबंधिताचे अर्ज कार्यालयास प्राप्त झाल्याची खात्री करावी, अन्यथा नव्याने अर्ज सादर करावेत.

| अ. क्र. | रिक्त पदे | पदनाम | विषय निहाय रिक्त पदे | | शैक्षणिक अर्हता | मानधन दर |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | विषय | रिक्त पदे | | |
| १ | ६ | उच्च माध्यमिक शिक्षक | गणित | २ | एम.एस.सी.बी.एड. | प्रचलित शासन निर्णयानुसार |
| | | | भौतिकशास्त्र | २ | एम.एस.सी.बी.एड. | |
| | | | इंग्रजी | १ | एम.ए.बी.एड. | |
| | | | मराठी | १ | एम.ए.बी.एड. | |
| २ | २७ | माध्यमिक शिक्षक | मराठी | ५ | बी.ए.बी.एड. | |
| | | | इंग्रजी | ४ | बी.ए.बी.एड. | |
| | | | गणित | ७ | बी.एस.सी.बी.एड. | |
| | | | इतर | ६ | बी.ए.बी.एड. | |
| | | | विज्ञान | ५ | बी.एस.सी.बी.एड. | |
| ३ | ३ | पदवीधर प्राथमिक शिक्षक | इंग्रजी | ३ | बी.ए.बी.एड. | |
| ४ | २८ | प्राथमिक शिक्षक | सर्व विषय | २८ | एच.एच.सी.डी.एड. | |
| ५ | १ | अधीक्षक (पुरूष) | - | १ | बी.एस.डब्ल्यू. | |
| ६ | २ | महिला अधीक्षिका | - | २ | बी.एस.डब्ल्यू. | |

वरील पदांची संख्या कमी-जास्त होऊ शकते.

**अटी व शर्ती :-**

- सदरची नियुक्ती ही शैक्षणिक सत्र २०२१-२२ करिता अत्यंत तात्पुरत्या स्वरूपात तासिका मेहनतानावर असल्याने, तासिकाप्रमाणे मेहनताना देण्यात येईल. तसेच सदर पदाबाबत विभागात नोकरीची संधी वा हक्क सांगता येणार नाही.
- उमेदवाराचा तासिकेवरील नियुक्तीचा कालावधी हा त्या पदावर नियमित नियुक्त उमेदवार रूजू होईपर्यंत किंवा शैक्षणिक सत्रापर्यंत (दिनांक ३०.०४.२०२२) यापैकी जे अगोदर येईल त्या कालावधीपर्यंत राहील.
- मुलाखतीस/मूळ कागदपत्रे तपासणीकरिता स्वखर्चाने यावे लागेल.
- उमेदवारास मुलाखतीस सूचना प्राप्त होण्याचे दृष्टीने संबंधित उमेदवाराने अर्जामध्ये दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.
- अर्जामध्ये स्पष्ट शैक्षणिक अर्हता, विषय नमूद करणे आवश्यक आहे.
- तासिका तत्त्वावर नियुक्ती केलेल्या उमेदवारास काम करावयाचे नसल्यास, कार्यालयास दोन महिने अगोदर तशी लेखी सूचना देण्यात यावी. तसे न केल्यास त्यांना अदा करण्यात आलेल्या एकुण मानधनापैकी अर्धी रक्कम वसूल करण्यात येईल.
- आयुक्तालयाचे पत्र दिनांक १८.०२.२०२१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दिनांक ३०.०४.२०१६ पूर्वी कार्यरत उमेदवारांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल. (दिनांक ३०.०४.२०१६ पूर्वी कार्यरत असल्याचे मुख्याध्यापक किंवा प्रकल्प अधिकारी यांचे अनुभव प्रमाणपत्राच्या आधारे)
- कार्यालयामार्फत नियुक्ती देण्यात आलेल्या ठिकाणी संबंधित उमेदवार रुजू न झाल्यास भविष्यात या कार्यालयामार्फत त्यांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
- उमेदवाराचे काम समाधानकारक नसल्यास किंवा वर्तणूक योग्य नसल्याचे आढळून आल्यास वा कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांना कमी केल्या जाईल व भविष्यात या प्रकल्पाअंतर्गत त्यांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
- उमेदवाराच्या कामाची आवश्यकता नाही असे वाटल्यास त्यांना कामावरून कमी करण्यात येईल.
- तासिका तत्त्वावरील उमेदवारांचे मानधन प्रत्यक्ष केलेल्या घड्याळी तासानुसार अदा करण्यात येईल. मानधन व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाही.
- शासनामार्फत नियमित कर्मचारी/शिक्षकांची नियुक्ती झाल्यास निवड केलेल्या उमेदवारांची सेवा आपोआप संपुष्टात येईल.

**(अंकित,भा.प्र.से.)**
**सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प**
**अहेरी जि. गडचिरोली**